**पाणी टंचाई निवारण कार्यक्रमांतर्गत तातडीच्या पाणी पुरवठा योजनांसाठी ५ टक्के लोकवर्गणीची अट लागू करण्याबाबत**

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**शासन निर्णय क्र.टंचाई-१००६/प्र.क्र.३४/पापु-१४**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.**
**दिनांक :- १३ सप्टेंबर, २००६**

पहा :- १. शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, क्र.टंचाई- ३०९९/प्र.क्र.१३/पापु-१४ दि.१ फेब्रुवारी, १९९९.
२. शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, क्र.टंचाई-२०९९/प्र.क्र.१४/पापु-१४ दि.२ फेब्रुवारी, १९९९.
३. शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, क्र.टंचाई-१०९९/प्र.क्र.१२/पापु-१४ दि.३ फेब्रुवारी, १९९९.

**प्रस्तावना :-**

राज्यातील ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणार्थ उपाययोजनांबाबतचे स्थायी आदेश उपरोक्त क्रमांक १ व ३ नुसार आणि नागरी भागातील पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणार्थ उपाययोजनांबाबतचे स्थायी आदेश क्र.२ येथील शासन निर्णयान्वये निर्गमित करण्यात आलेले आहेत.

केंद्र शासनाच्या सुधारित मार्गदर्शक सूचना राज्यातील पाणी पुरवठा कार्यक्रमासाठी लागू करण्यात आल्या असून सुधारित धोरणानुसार लोकसहभाग व मागणी आधारित पाणी पुरवठा कार्यक्रम राबविण्यात येत आहे. ग्रामीण तसेच नागरी पाणी पुरवठा योजनांसाठी नव्याने विहित केलेल्या आर्थिक आकृतीबंधानुसार १० टक्के लोकवर्गणी अनिवार्य करण्यात आलेली आहे. तसेच जलस्वराज्य, स्वजलधारा, पंतप्रधान विंधण विहिर कार्यक्रम या सारखे कार्यक्रम राबविताना देखील १० टक्के लोकवर्गणी अनिवार्य करण्यात आली आहे. नवीन धोरणानुसार ग्रामीण पाणी पुरवठा योजने अंतर्गत पूर्वी पूर्ण झालेल्या योजनांच्या देखभाल व दुरुस्तीसाठी शासनाकडून देण्यात येणारे अनुदान टप्प्याटप्प्याने कमी करुन ते पूर्णपणे बंद करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. योजनांच्या देखभाल व दुरुस्तीसाठी शासनाकडून देण्यात येणारे अनुदान कमी झाल्याने, टंचाई निवारण कार्यक्रमांतर्गत नळ योजनांच्या विशेष दुरुस्त्या तसेच विंधण विहिरीची दुरुस्ती यासारख्या उपाययोजना पाणी टंचाई निवारण कार्यक्रमातून घेण्याचे प्रमाण वाढले असल्याचे दिसून आले आहे.

पाणी टंचाई कार्यक्रमांतर्गत घेण्यात येणा-या उपाययोजनांना अधिक सक्षमतेने राबविणे शक्य व्हावे व यावर शासनाचा होणारा खर्च कारणी लागावा या दृष्टीकोनातून ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणार्थ घेण्यात येणा-या विंधण विहिरीची विशेष दुरुस्ती, नळ योजनांची विशेष दुरुस्ती , तात्पुरत्या पूरक नळ योजना या उपाययोजनांसाठी तसेच नागरी भागात 'क' वर्ग नगरपालिकांसाठी रु.६.०० लक्ष पर्यंतच्या जिल्हाधिकारी व विभागीय आयुक्त यांचेमार्फत राबविण्यात येणा-या तातडीच्या पाणी पुरवठा योजनांसाठी ५ टक्के लोकवर्गणीची अट लागू करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय :-**

ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणार्थ घेण्यात येणा-या १) विंधण विहिरीची विशेष दुरुस्ती, २) नळ योजनांची विशेष दुरुस्ती, ३)तात्पुरत्या पूरक नळ योजना या उपाययोजनांसाठी तसेच ४) नागरी भागात क वर्ग नगरपालिकांसाठी रु.६.०० लक्ष पर्यंतच्या जिल्हाधिकारी व विभागीय आयुक्त यांचेमार्फत राबविण्यात येणा-या तातडीच्या पाणी पुरवठा योजनांसाठी ५ टक्के लोकवर्गणीची अट लागू करण्यात येत आहे.

जिल्हास्तरावर या उपाययोजनांना मान्यता देताना जिल्हाधिकारी यांनी या उपाययोजनांची ५ टक्के लोकवर्गणी भरण्याबाबत संबंधित ग्रामपंचायत/ नगरपालिका यांनी ठराव केलेला आहे याची खातरजमा करुन पाणी टंचाई निवारण कार्यक्रमाच्या प्रचलित निकषाच्या आधारे या उपाययोजनांना प्रशासकीय मान्यता दयावी.

हे आदेश दि.१ ऑक्टोबर २००६ पासून सुरु होणा-या पाणी टंचाई कालावधीपासून लागू होतील.

सदर शासन निर्णय शासनाच्या w.w.w.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २००६०९१३१२२७१७००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

**(भि.ना.पतिंगे)**
**उपसचिव, महाराष्ट्र शासन.**

प्रति,

१. विभागीय आयुक्त (सर्व)
२. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.
३. मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
४. जिल्हाधिकारी (सर्व)
५. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व )
६. पाणी पुरवठा अधिकारी तथा अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
७. मुख्य लेखा परिक्षक स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, नवी मुंबई.
८. उपमुख्य लेखा परिक्षक स्थानिक निधी लेखा (सर्व)
९. जिल्हा स्थानिक निधी लेखा परिक्षक (सर्व )
१०. महालेखापाल महाराष्ट्र-१, मुंबई (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता)
११. महालेखापाल महाराष्ट्र-२, नागपूर (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता)
१२. मुख्यलेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व )
१४.निवडनस्ती पापु-१४

E:\CR ३४-०६ १० % P.C to TPWS, Nal Yojana vishesh Durusti, Vidhan vihir vishesh durusti.doc